**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः01.06.2026** **वारःसोमवार**

---

1. ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचं निधन; संगीत विश्वावर शोककळा
2. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन
3. समाजासाठी चांगलं काम करणाऱ्या व्यक्तींकडून प्रेरणा घेऊन काम करण्याचं पंतप्रधानांचं मन की बातमधून आवाहन
4. सात्विक चिराग जोडीला सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचं विजेतेपद
5. आयपीएलचं जेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला आणि
6. राज्याच्या विविध भागात आज पावसाचा अंदाज; मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये-मुख्यमंत्र्यांचा सल्ला

**सुमन कल्याणपूर-निधन**

भावसंगीतात आपल्या मखमली आणि मधाळ स्वरांनी अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका ,सुमन कल्याणपूर यांचं काल रात्री मुंबईतल्या राहत्या घरी निधन झालं. त्या 89 वर्षांच्या होत्या.

सुमन कल्याणपूर यांच्या निधनानं संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे.

28 जानेवारी 1937 या दिवशी अविभाजीत भारतातल्या ढाका इथं त्यांचा जन्म झाला. गायन आणि चित्रकलेची आवड असलेल्या सुमनताईनी पंडित लक्ष्मण राव अमृते, पंडित केशवराव भोळे , उस्ताद खान अब्दुल रहमान खान आणि पंडित यशवंत देव यांच्याकडून शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेतलं. सुमन हेमाडी या नावानं संगीत क्षेत्रात प्रवेश केलेल्या सुमनताई ,लग्नानंतर सुमन कल्याणपूर या नावानं प्रसिद्ध झाल्या. 1952 मध्ये ऑल इंडिया रेडिओवर

गाण्याची संधी त्यांना मिळाली. केतकीच्या बनीसारखं भावगीत , निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला सारखी अंगाई ,गवळण, विरहगीतं, भावगीतं , भक्तीगीतं, बालगीतं अशा वैविध्यपूर्ण मराठी गाण्यांनी त्यांनी एक काळ गाजवला. भारतरत्न लता मंगेशकर , आशा भोसले, गीता दत्त, शमशाद बेगम या गायिकांच्या तारकामंडळात त्यांनी स्वतः चं स्थान निर्माण केलं. अजहून आये बालमा , ठहरिये होश मे आ लू , न तुम हमे जानो सारखी असंख्य गाणी गाऊन त्यांनी हिन्दी चित्रपट संगीतातही आपला वेगळा ठसा उमटवला.
अत्यंत भावपूर्ण आणि मधुर आवाजात त्यांनी मराठी, हिंदीसह विविध भाषांमधील हजारो गाणी अजरामर केली. त्यांच्या आवाजातली सात्त्विकता आणि भाव रसिक मनाला थेट भिडणारे होते.

सुमन सुगंध हे त्यांचं आत्मचरित्र प्रकाशित झालं आहे. संगीतातल्या त्यांच्या अमूल्य योगदानासाठी भारत सरकारनं पद्मभूषणनं तर मध्य प्रदेश सरकारनं लता मंगेशकर पुरस्कारांनं त्यांना सन्मानित केलं आहे.

भारतीय संगीत क्षेत्रातील दैवी आणि सुरेल ‘सुमन’ असा स्वर आज शांत झाला, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा अजित पवार यांनी सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## अहिल्यादेवी होळकर जयंती

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशतकोत्तर पहिल्या जयंतीनिमित्त काल राज्यभरात त्यांना अभिवादन करण्यात आलं. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. अहिल्यानगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातल्या चौंडी या अहिल्यादेवींच्या जन्मगावी आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यासह अन्य मंत्री आणि आमदार उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या मूल्यांचा प्रसार अहिल्यादेवींनी आपल्या कार्यातून देशभर केला. त्यांच्या विचारांचा वारसा अंगीकारण्याची समाजाला गरज आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी चौंडी इथल्या अभिवादन सभेत केलं.

अहिल्यादेवींनी न्यायदानाची भक्कम व्यवस्था उभी केली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र महिला सैन्य तुकडी उभारण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आदरांजली वाहिली.
सोलापूर शहरात झालेल्या अभिवादन कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या विचारांचा आणि आदर्श कार्यपद्धतीचा वारसा जतन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

**<u>मन की बात</u>**

देशहितासाठी, समाजहितासाठी असामान्य कार्य करणाऱ्या विविध ठिकाणच्या नागरिकांच्या कार्यातून आपल्याला नवी प्रेरणा मिळते, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मन की बात कार्यक्रमात केलं. समाजासाठी निस्वार्थ वृत्तीनं काम करणाऱ्या विविध व्यक्तींचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं मोदी म्हणाले. कोकणातल्या हापूसप्रमाणेच देशाच्या विविध भागात आढळणाऱ्या आंब्याच्या प्रकारांचा उल्लेख करुन त्यांनी आंबा उत्पादनाचा प्रवास गावखेड्यातून जागतिक बाजारपेठेपर्यंत झाला आहे असं सांगितलं.
आपल्या छंदासाठी वेळ काढणं आणि सतत काहीतरी नवीन शिकत राहणं गरजेचं आहे असं सांगून विद्यार्थ्यांनी सुट्टीचा उपयोग यासाठी करावा असं पंतप्रधान म्हणाले. तारांगण पाहायला जाणं किंवा खगोलशास्त्र मंडळाचे सदस्य होणं अशा गोष्टी अवश्य करा असं सांगताना पंतप्रधान म्हणाले.....

**साथियों रात में तारों को निहारना अपने आप में अद्भुत अनुभव होता है। ज्योतिर्विद्या परिसंस्था भी एस्ट्रोनॉमी के सबसे पुराने संस्थानों में से एक है। यहां ऑब्जर्वेशनल फैसिलिटीज के साथसाथ बुक्स, लाइब्रेरी और टेलीस्कोप**

**लाइब्रेरी की सुविधा भी है। मैं युवाओं से आग्रह करूँगा की वे किसी एस्ट्रोनॉमी क्लब से जरूर जुड़े और इन छुट्टियों में किसी प्लैनेटेरियम को भी जरूर देखने जाए।**

पुण्यातील ज्योतिर्विद्या परिसंस्थेचा उल्लेख पंतप्रधानांनी कालच्या भागात केला. याबाबत बोलताना संस्थेचे उपाध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे म्हणाले.....

**एकोणीसशे चव्वेचाळीस साली स्थापन झालेल्या या संस्थेच्या अगणित सभासदांनी केलेल्या कामाची ही पोचपावतीच म्हणायला लागेल. इंग्रजी राजवटीत खगोलशास्त्राचा अभ्यास अभ्यासक्रमातून काढून टाकल्यामुळे पुण्यातील काही नामवंत लोकांनी एकत्र येऊन ज्योतिर्विद्या परिसंस्थेची स्थापना केली. आकाश दर्शनाचे कार्यक्रम, प्रदर्शने वेधशाळांच्या अभ्यासली, खगोलशास्त्रीय अभ्यास वर्ग अशा अनेक माध्यमातून वर्षभर खगोलशास्त्राचा प्रसार चालू असतो. तसेच निरीक्षणासाठी, वेगवेगळ्या दुर्बिणी संस्थेकडे आहेतच पण सभासदांसाठी पुस्तके आणि दुर्बिणी यांची लायब्ररी पण आहे. सभासदांच्या अभ्यासासाठी लोकमान्य टिळकांच्या केसरीवाड्यावरती संस्थेची स्वयंचलित दुर्बिण असून त्यातून रूपविकारी ताऱ्यांची निरीक्षणे घेतली जातात तर लघुग्रहांच्या पिधानांचीही निरीक्षणे घेतली जातात. त्याचप्रमाणे उल्का वर्षावाची पण निरीक्षणे ज्योतिर्विद्या घेते. ही सगळी निरीक्षणे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठवली जातात. जगभराचे खगोल निरीक्षक त्यांचा वापर करतात.**

सध्या देशाच्या अनेक भागात कडक उन्हाळ्याची स्थिती आहे. अशा वेळी नागरिकांनी सतत थोडं थोडं पाणी पित राहावं आणि सरकारनं दिलेल्या मार्गदर्शक सूचना लक्षात ठेवून त्याप्रमाणे राहणीमानात बदल करावा असा सल्ला पंतप्रधानांनी दिला.

**विधानपरिषद महायुती**

विधान परिषदेच्या 17 जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीकरता महायुतीचं जागावाटप काल ठरलं. भाजपा 11, शिवसेना 4 आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 2 जागा लढवेल. भाजपा नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा-सांगली या मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवेल. तर, शिवसेना ठाणे, नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ या मतदारसंघांत निवडणूक लढवणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुणे आणि रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या 2 जागा लढवेल.

**विषारी दारू प्रकरण**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू प्यायल्याने आतापर्यंत 24 जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य सरकारने याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवला असून तपासासाठी सीआयडीची पाच विशेष पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेऊन पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातल्या काही अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं आहे.

**बॅडमिंटन**

भारतीय बॅडमिंटनपटू सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीचं जेतेपद मिळवलं. काल झालेल्या अंतिम फेरीच्या सामन्यात सात्विक आणि चिरागनं इंडोनेशियाच्या जोडीचा 18-21, 21-17, 21-16 असा पराभव केला.

**आय पी एल-अंतिम सामना**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने, काल इंडियन प्रीमियर लीग अर्थात आय पी एल क्रिकेट स्पर्धेचं सलग दुसऱ्यावेळी अजिंक्यपद पटकावलं. अहमदाबाद इथं अंतिम सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने गुजरात टायटन्स संघावर 12

चेंडू आणि 5 गडी राखून विजय मिळवला. बंगळुरू संघानं नाणेफेक जिंकून, प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत, गुजरात टायटन्सला 155 धावांवर रोखून धरलं. यात, वॉशिंगटन सुंदरने केलेल्या नाबाद 50 धावांचा समावेश आहे. विराट कोहलीने फटकावलेल्या नाबाद 75 धावा निर्णायक ठरल्या. विराटला सामनावीर तर, वैभव सूर्यवंशीला मालिकावीर घोषित करण्यात आलं.

**<u>पेरणी-मुख्यमंत्री</u>**

राज्यात काही भागांत आजपासून वादळी पावसाची शक्यता असली, तरी त्याचा मोसमी पावसाशी कोणताही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळमध्ये पोहोचलेला नाही. त्यामुळे शेतकरी बांधवांनी मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. योग्य आणि स्थिर पावसाची खात्री झाल्यानंतरच पेरणीचं नियोजन करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**